# स्पंदन

वर्ष १९९२-९३



## दूधसाखर महाविद्यालय, बिद्री.

॥ विद्या परम् भूषणम् ॥

# श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)

## ता. कागल, जि. कोल्हापूर

फोन नं. ४९७१

परिसराच्या आर्थिक उन्नतीबरोबरच शैक्षणिक विकास व प्रगती साधावी या उदात्त हेतूने कार्यरत असलेल्या आमच्या शैक्षणिक शाखा

## दूधसाखर वरिष्ठ महाविद्यालय

(कला, विज्ञान व वाणिज्य)

## दूधसाखर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय

(कला, विज्ञान, वाणिज्य व व्यावसायिक)

## दूधसाखर सैनिक शाळा प्रवेश तयारी वर्ग

## दूधसाखर विद्यानिकेतन

(प्राथमिक विभाग)

## ❑ ठळक वैशिष्ट्ये ❑

- सर्वच शैक्षणिक शाखांसाठी भव्य व सुसज्ज इमारती
- उच्च गुणवत्ताप्राप्त शिक्षक वर्ग
- शिक्षण, कला, क्रीडा व संस्कार यासाठी वैयक्तिक व विशेष लक्ष
- अद्ययावत व सुसज्ज ग्रंथालय, प्रयोगशाळा, क्रिडांगण व अभ्यासिकेची स्वतंत्र सोय.
- शांत व निसर्गरम्य परिसर

**मा. मारूतीराव वारके**
उपाध्यक्ष

**श्री. के. डी. गोसावी**
सेक्रेटरी

**मा. दिनकररावजी जाधव**
अध्यक्ष

**श्री. आर. आर. जगदाळे**
जनरल सेक्रेटरी

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळाचे

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

**(मौनीनगर) , तालुका कागल, जिल्हा कोल्हापूर**

## श्रद्धांजली

‘ स्पंदन ’ साहित्य अंक सालात भारतातील जे थोर नेते,
संशोधक, शास्त्रज्ञ, लेखक, चित्रपट कलावंत व
आपल्या परिसरातील ज्ञात, अज्ञात लोक
दिवंगत झाले, त्यांच्या पवित्र स्मृतिस
अभिवादन करून आम्ही भावपूर्ण
श्रद्धांजली अर्पण
करीत आहोत ! !

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळाचे

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

# ॥ स्पंदन ॥

## वार्षिक अंक पहिला

१९९२-९३

**संपादक मंडळ**

अध्यक्ष - प्राचार्य डॉ. तु. ल. कोतमिरे

कार्यकारी संपादक - प्रा. संजय पाटील

सह - संपादक - प्रा. डॉ. संजय गायकवाड

**विभागीय संपादक**

प्रा. संजय पाटील / मराठी

प्रा. सादिक देसाई / हिंदी

प्रा. दत्ता पाटील / इंग्रजी

**प्रकाशक**

डॉ. तु. ल. कोतमिरे

एम. ए. पीएच्. डी.

प्राचार्य, दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

**मुद्रक**

प्रदीपरावं पडवळे, श्री मुरारी ऑफसेट प्रिंटर्स, कोल्हापूर

**मुखपृष्ठ**

प्रा. शरद कुलकर्णी

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळाचे

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

॥ विद्या परम् भूषणम् ॥

# स्पंदन

पहिला वार्षिक अंक

१९९२-९३

# संपादकीय

दूधसाखर महाविद्यालयातील तरुणाईचे हे पहिले-वहिले स्पंदन !

**'स्पंदन'** च्या माध्यमातून आपल्यासमोर येताना आम्हाला आनंद आणि समाधान वाटत आहे.

'काळम्मावाडी' प्रकल्पाने सुजलाम्, सुफलाम् होणारा व मौनी महाराजांचा पवित्र स्पर्श लाभलेला हा परिसर ! दूधगंगा नदीचा सुंदर व दिमाखदार वळसा लाभलेला उंच अशा बिद्री टेकडीच्या रम्य पायथ्याशी आमचे शानदार आणि सुंदर महाविद्यालय वसलेले आहे. सभोवताली दूधगंगा नदीच्या कृपेने लाभलेला व हिरवळीने वेष्ठिलेला हा परिसर. डोंगरदऱ्यांतील ग्रामीण जनतेला सुज्ञ करणारी ही एक शैक्षणिक क्रांतीच आहे. अशा प्रकारची क्रांती घडवून आणण्यात दूधगंगा-वेदगंगा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष व माजी आमदार मा. दिनकररावजी जाधव, त्यांचे सहकारी आणि अधिकारीवर्ग यांचे या परिसरावर अनंत उपकारच ! दूधसाखर शिक्षण मंडळाने लावलेल्या रोपट्याचे मोठ्या वटवृक्षात रूपांतर होत आहे. सन १९९०-९१ साली वरिष्ठ महाविद्यालय सुरू होऊन कला व शास्त्र शाखा वाढीस लागल्या. चालू शैक्षणिक वर्षापासून वाणिज्य शाखा सुरू होत आहे याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. धन्य ती दूधगंगा माऊली ! **अन् धन्य हा दूधगंगा परिसर !**

महाविद्यालयातील तरुणांच्या सुप्त गुणांना चालना देण्याचा अल्पसा प्रयत्न आम्ही 'स्पंदन'च्या माध्यमातून केला आहे. या अंकातील साहित्याला विद्यार्थ्यांचा आधार आहे, पण त्याला वळण देण्याचे कर्तव्य आम्ही केले आहे. हे 'स्पंदन' उद्याच्या साहित्यिकांना जन्म देणारे ठरणार आहे. येथील तरुणांच्या साहित्यातून प्रकट होणारी वैचारिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक बैठक यांचे दर्शन या 'स्पंदन'मधून घडून येते. लेखनकलेबरोबरच आमच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक तसेच क्रीडाक्षेत्रातही राज्य व राष्ट्रीय पातळीवर धवल यश प्राप्त करून महाविद्यायाचे नाव थोड्याच कालावधीत कमावले आहे. आमचे विद्यार्थी सामाजिक उपक्रमामध्येही उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन कार्य करतात. राष्ट्रीय सेवा योजना, प्रौढ शिक्षण, ग्राम स्वच्छता इत्यादी उपक्रमामध्येही आमचे विद्यार्थी अग्रेसर आहेत.

'स्पंदन' साठी विद्यार्थ्यांनी पुष्कळ साहित्य देऊन उत्स्फूर्त सहभाग दाखवला. पण अंकाच्या मर्यादेमुळे सर्वच साहित्य छापणे शक्य झाले नाही.

खरे तर महाविद्यालयीन उपक्रमातील नियतकालिक प्रकाशन हा वर्षभरातील सर्वांत अखेरचा पण अति आतुरतेचा उपक्रम असतो. चेहरा हा जसा मनाचा आरसा तद्वतच वार्षिक नियतकालिक हे महाविद्यालाचा आरसा असते. त्यातूनच वर्षभरात घडलेल्या सर्व घटना व प्रसंगाचे साद-पडसाद निनादत राहतात. वर्षभरातील उपक्रमाच्या पाऊलखुणा उमटलेल्या असतात. विजयपताका डौलाने फडकत असतात. भावी कलावंताच्या सुप्त गुणांच्या लाटा उसळताना आढळतात. म्हणूनच अशा नियतकालिकाच्या अंकाची सर्वांच्या मनात उत्सुकता लागून राहते.

या अंकास अनेकांचे सहकार्य मिळाले आहे. आमचे प्राचार्य डॉ. तु. ल. कोतमिरे व संपादक मंडळ यांच्य मदतीने हा अंक बहारदार झाला आहे. प्रा. एन. डी. पाटील, प्रा. एल. एस. करपे, प्रा. एस. सी. कुलकर्ण

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी यांच्या विशेष सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. त्याचबरोबर या अंकाचे मुद्रक श्री. प्रदीपराव पडवळे यांचे व श्री दूधगंगा - वेदगंगा सहकारी साखर कारखाना, बिद्री, दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री, युनायटेड डिस्टिलरी शाहूनगर परिते यांनी जाहिरात रूपाने केलेले आर्थिक सहाय्य व अनेक मान्यवर या सर्वांचे मी आभार मानतो.

महाविद्यालयाचा पहिलाच अंक प्रसिद्ध होत आहे. त्यामुळे कळत-नकळत काही त्रुटी राहण्याची शक्यता आहे, असे असले तरी -

"न्यून ते पुरते । अधिक ते सरते

करूनि घेयावे हे तुमते । विनवीले मिया ॥"

या उक्तीप्रमाणे या अंकाकडे पहावे हीच अपेक्षा !

॥ जय हिंद ॥




तुमचाच . . .
प्रा. संजय पाटील
संपादक स्पंदन १९९२-९३

# प्राचार्य



डॉ. तु. ल. कोतम्बिरे

,एम. ए. पी. एच. डी.

# मान्यवरांच्या गाठी - भेटी



"दुसऱ्याच्या सुखात आपले सुख पाहणे हेच मानवतेचे खरे लक्षण आहे."
डॉ. ल. रा. नासिराबादकर - मराठी विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रा. डी. यू. पवार**
न्यू कॉलेज, कोल्हापूर. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना





**डॉ. रा. भा. देवस्थळी**
शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख - शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर वार्षिक स्नेहसंमेलन १९९२-९३

"नजरेसमोर ध्येय असेल आणि जिद्दीने अभ्यास केल्यास हमखास उज्वल यश संपादन करता येते."
मा. नामदेवराव भोईटे -
निरोप समारंभ बी. ए., बी. एस्सी. भाग ३ (१९९२-९३



श्री दुधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि. बिद्री
श्री दुधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री ( मौनीनगर )
ता. कागल, जि. कोल्हापूर

# मान्यवर संचालक मंडळ



**मा. दि. भा. जाधव**
अध्यक्ष



**मा. मा. वि. वारके**
उपाध्यक्ष



**मा. आर. आर. जगदाळे**
कार्यकारी संचालक



**मा. के. डी. गोसावी**
शिक्षण संस्था सेक्रेटरी


मा. बा. य. भोसले


मा. ना. शं. भोईटे


मा. म. दा. तोरस्कर


मा. पां. दा. मगदूम


मा. प्र. वि. पाटील


मा. कृ. प. पाटील


मा. हिं. भा. देसाई


मा. के. गो. नांदेकर


मा. ना. को. चौगले


मा. बा. हिं. पाटील


मा. वि. कृ. मोरे


मा. बं. कुं. पाटील


मा. द. शं. देसाई


मा. रं. धों. कोतमिरे


मा. सौ. सु. सु. सुर्यवंशी


मा. सौ. पा. शा. रानमाळे

# मराठी

आम्हां घरीं धन शब्दांचींच रत्नें ।
शब्दांचींच शास्त्रें यत्न करुं ॥१॥
शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन ।
शब्दें वाटूं धन जनलोकां ॥२॥
तुका म्हणे पहा शब्दची हा देव ।
शब्देचि गौरव पूजा करुं ॥३॥

- संत तुकाराम

विभागीय संपादक
प्रा. संजय पाटील



# अनुक्रमणिका

# मराठी विभाग

## गद्य विभाग


| | |
|---|---|
| १) स्त्री काल आणि आज | दत्ता पाटील |
| २) राष्ट्रीय एकात्मता - काळाजी गरज | उत्तम चौगले |
| ३) नव्या वर्षाचे आव्हान स्वीकारू या | सदाशिव पालकर |
| ४) मुरडणाऱ्या नाकाकडे लक्ष द्यायला वेळ कुठे ? | विजयकुमार कांबळे |
| ५) दोन पत्रे व दोन प्रेमी | संजय पाटील |
| ६) अनुभवाचे बोल | पांडुरंग लोंढे |
| ७) वशिला | लहू अंगज |
| ८) माझा भारत महान | चंद्रकांत पोवार |
| ९) प्रेम एक परिक्षण | कृष्णात मुसळे |
| १०) आजचा विद्यार्थी | दत्तात्रय जाधव |


## कविता विभाग


| | |
|---|---|
| १) थोडी फुले घेऊन जा | मनवेल फर्नांडीस |
| २) प्रयत्न | गोरे एम. ए. |
| ३) जीवन | कु. छाया खांबे |
| ४) मन | प्रल्हाद हजारे |
| ५) आठवण | नामदेव शिंदे |
| ६) वेड्या मनाची व्यथा | एस. एम. पाटील |
| ७) जीवनात येशील का ? | अशोक शिर्के |
| ८) संदर्भ | वैशाली संभोस |
| ९) स्वप्न | कृष्णात सुर्यवंशी |
| १०) प्रश्न | चंद्रभागा पाटील |
| ११) प्रेम करा | शरद बलुगडे |
| १२) चाहूल | रमेश पाटील |
| १३) बंधन | संभाजी चौगले |
| १४) व्यथा | नेताजी फराकटे |
| १५) अवचित सारे घडून गेले | अशोक कांबळे |
| १६) एकतर्फी प्रेम | पी. एस. पाटील |
| १७) विरह | रमेश मोरे |
| १८) आठवण | भरत पाटील |
| १९) आशा | रामचंद्र पाटील |
| २०) गरीबी | प्रभावळे एस्. जी. |
| २१) आई | चंद्रकांत तोरस्कर |
| २२) अमीर गरीब | पांडूरंग चिंदगे |
| २३) अजूनही विश्वास बसंत नाही | सावजी पाटील |
| २४) प्रिती | धनाजी भोईटे |
| २५) भास | आर. एस्. मयेकर |
| २६) विचार | विलास पाटील |
| २७) नशिब | किशोर चौगले |
| २८) वळण | आनंदा बिल्ले |
| २९) वेध | एम्. डी. वाईत |
| ३०) कॉलेज | विष्णू पाटील |
| ३१) एकाकी | डी. पी. मालवेकर |
| ३२) बिनधास्त | संदीप मालवेकर |
| ३३) शायनिंग | दत्तात्रय भोसले |
| ३४) अखेर जीवन आहेत तरी काय ? | रघुनाथ जाधव |
| ३५) कोर्टाची पायरी (हास्यविनोद) | विश्वास फराकटे |

# स्त्री : काल आणि आज

दत्ता पाटील
बी.ए.- ३

स्त्री म्हटलं की एक दुर्बल, कोमल, सुंदर, नाजूक असे दृष्य आपल्यासमोर उभे राहते. रुसोसारखा तत्त्ववेत्ताही म्हणतो "Man is for the fields and woman is for the huts"

तुलसीदास म्हणतात - "ढोल, गवार, मृदंग, शूद्र, पशू नारी ये सब ताडन के अधिकारी,"

तर मनु म्हणतो - "न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हती"

पण खरं पाहिलं तर स्त्रीने राजकारण व युद्धभूमी गाजविण्याची पुराणकालापासूनची उदाहरणे आहेत. जो रक्ताच्या प्रत्येक थेंबातून पुनःपुन्हा जिवंत होत होता त्या महिषासुरास सामोरी गेलेली चंडिका ही एक शौर्याचा आदर्श ठेवणारी स्त्रीच होती. पुराणे बाजूस सारली तरी इतिहासातही स्त्री शौर्याची गाथा आहेच. राणी लक्ष्मीबाई जीवात जीव असे पर्यंत इंग्रजांविरुद्ध लढली. कॅप्टन लक्ष्मीबाईने सुभाषचंद्र बोसांबरोबर स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला. कमल दोंदे, कुसूम रणदिवे सारख्या युवती स्वातंत्र्यासाठी शाहीर झाल्या. व्हलेन्टीना तेरेस्कोवीने अंतराळात जाऊन स्त्री कोणत्याही प्रकारे कमी नाही हे दाखवून दिले.

स्त्रीला मानसिकदृष्ट्या दुर्बल समजले जाते पण इंदिरा गांधी, मागरिट थॅचर, अरूणा असफली, बेनझीर भुट्टो आदि स्त्रीयांनी आपल्या कर्तृत्वाने तिच्या मानसिक सबलतेचे उदाहरण दिले आहे. वजन उचलणे, धावणे, पोहणे, भालाफेक, ज्युदो व कराटे सारख्या क्रीडाक्षेत्रातही आज अनेक स्त्रीयांनी प्राविण्य मिळविले आहे. आज स्त्री विमान, बस, ट्रक ऑटोरिक्षा यांसारखी वाहनेही चालवू शकते किरण बेदी, मीरा बोरवणकर यांची पोलीस क्षेत्रातील कामगिरी आज मुलींना आदर्श ठरली आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रातही अनेक परिक्षांचे निकाल पाहिले असता विद्यार्थिनीच आघाडीवर असताना दिसतात. उलट स्त्रीया जिथे काम करतात तिथे भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी असते. आज जीवनाची क्षेत्रे आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अशी विखुरलेली आहेत. या सर्व व्यापक पातळीवर स्त्री म्हणून विचार करताना तिचे स्थान दुय्यमच असलेले दिसते. १९ व्या शतकामध्ये म. फुले, सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, राजा राममोहन रॉय, पंडिता रमाबाई या समाजसुधारकांनी यावर विचार मांडले, संघर्ष केला. मात्र स्त्री शोषण - समाजामध्ये चालूच राहिले आहे. २० व्या शतकात याहून स्त्रीचा थोडा बहूत विकासही झाला. पण नेमका काय ते तपासून पाहिले पाहिजे, कारण आजही रिंकू पाटील, रुपकुंवर, कोमल मगदूम, आरती शहा सारख्या मुली जाळल्या जाताहेत, मारल्या जाताहेत.

आज स्त्रिया शाळेत जातात पण त्यांचे प्रमाण फारच अल्प आहे. लहानपणी मुली त्रास देतात म्हणून शाळेत, मोठेपणी लग्न जमेपर्यंत कॉलेजमध्ये पाठविणे यापलिकडे पालकांचा शिकवण्याचा हेतु नसतो. यातूनच पालकांचा मुलीविषयी दृष्टिकोन दुय्यम असल्याचे दिसते. यामागे अज्ञान, अंधश्रद्धा, जुनाट परंपरा यावर आधारलेली प्रसार माध्यमे प्रभावी काम करताना दिसतात. आज प्रामुख्याने शाळा कॉलेजमध्ये विद्यार्थिनी जाताना, वावरताना पाहिले तर ती सुरक्षित नसल्याची दिसते. सर्व विद्यार्थ्यांकडून होणारी चेष्टा, टोमणे याला तिला तोंड द्यावे लागते. लेडीज रूम, स्वच्छतागृहे यासारख्या सुविधाही तिला व्यवस्थित मिळत नाहीत.

आपला देश लोकशाही पद्धतीच्या राजकारणाचा आहे, याची शिकवण खऱ्या अर्थाने शाळा-कॉलेजमध्ये मिळायला हवी. त्यासाठी योग्य व खुल्या वातावरणात कॉलेजमधील निवडणुका होण्याची गरज असते पण गुंडगिरी, गँगवॉर, आर्थिक प्रलोभने, मारामारी या जोरावरच या निवडणुका होताना दिसतात. त्यामध्ये मुलींचे स्थान नगण्य असते. सामाजिक क्षेत्रात वावरत असताना तिच्याबाबत शासन आवश्यक सेवा सुद्धा देताना दिसत नाही. आज कस्टडीत सुद्धा एकट्या स्त्रीला ठेवणे धोक्याचे झाले आहे. अशा कितीतरी समस्या आज विद्यार्थिनींना, स्त्रीयांना भेडसावताना दिसताहेत. यासाठी शाळा कॉलेजातून मुलींना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणारे शिक्षण त्यांना मिळायला हवे. त्यांच्या व्यक्तीगत, आरोग्यविषयक व कायदेविषयक ज्ञानात वाढ होईल असा स्वंतत्र विषय अभ्यासक्रमात समाविष्ट होण्याची गरज आहे.



# राष्ट्रीय एकात्मता : काळाजी गरज

उत्तम चौगले
बी.ए-

'अवती - भवती हितशत्रूंचा धीर चेपला आहे,

धगधगत्या ज्वालांनी माझा देश वेढला आहे.

नंदनवन हे आज आतुनी पेटले आहे,

हिंदुस्ताना, जाग तुझ्यावर डाव बेतला आहे.

देशाविरोधी नारे ऐकून पोर विचारू लागे,

आज असा का नानक वंशज शीख पेटला आहे ?

अणू निर्मिला शेजाऱ्याने आज बातमी आली,

तरी तुझ्यावर अलिप्ततेची तीच मेखला आहे.

हिंदुस्ताना, जाग, तुझ्यावर डाव बेतला आहे !

काय हो, जगामध्ये तिसरी महाशक्ती म्हणून वावरणाऱ्या अलिप्त राष्ट्रांचे नेतृत्व करणाऱ्या या भारत देशाचा अंतरंग कसा आहे ? विविध धर्मांचा, विविध भाषांचा, विविध जातींचा, विविध पंथांचा समावेश असणाऱ्या या भारत देशाकडे पाहिलं की अशी भीती निर्माण होते, ज्याची सुरुवात पाकिस्तानच्या फाळणीने झाली त्याचा शेवट खलिस्तान, गोरखालँडसारख्या तुकड्यांनी होतो की काय ? आणि मग खऱ्या अर्थाने आपल्याला राष्ट्रीय एकात्मतेची आवश्यकता भासते.

त्याचप्रमाणे राष्ट्रीय एकात्मतेची भावना सध्या भारतात फार कमी आहे. ती कशी निर्माण करावयाची हा एक यक्ष प्रश्न आहे. स्वातंत्र्यापूर्वी देशाचे स्वातंत्र्य प्राप्त करणे ही फार मोठी प्रेरणा होती. त्या प्रेरणेमुळे राजकीय कार्यकर्ते पुष्कळच झाले. पण सामाजिक जागृती ही बऱ्याच प्रमाणात होऊ शकली नाही. आता कर्तव्य भावनेला आवाहन करायला काही उरले नाही. देशाची प्रगतीही प्रेरणेचा विचार आहे. पण भावनेशिवाय नुसत्या विचाराने फारसे कार्य साधत नाही. शिवाय सर्व देशाची प्रगती माझ्या जातीची, माझ्या राज्याची प्रगती असे लोकांना वाटतच नाही.

माझे व्यक्तीशः असे मत नाही की आमच्यामध्ये राष्ट्रीय एकात्मता मुळीच नाही. आणि जर तसे असते तर आमचे राष्ट्र जिवंतच राहिलं नसतं, कधीच या देशाचं नाव जगाच्या नकाशावरून पुसलं गेलं असतं. उदा. १९६२ चा हल्ला आम्ही परतवून लावला त्यावेळी आमच्यामध्ये एकता होतीच पण आज चित्र फार विचित्र झालंय आणि म्हणूनच राष्ट्रीय एकात्मतेवर विचार मांडण्याची माझी इच्छा झाली. मघापासून मी राष्ट्रीय एकात्मता म्हणजे काय याचे स्पष्टीकरण केलेले नाही. आणि मग राष्ट्रीय एकात्मता म्हणजे काय हे पाहताना राष्ट्र कशाला म्हणायचे हे पहाणे अतिशय गरजेचे आहे. डोंगर, नद्या, नाली, गगनचुंबी इमारती यांना राष्ट्र म्हणायचं का ? तर राष्ट्र म्हणजे ज्याला इतिहास आहे, संस्कृती आहे, परंपरेचा सार्थ अभिमान आहे. जेथील लोकांची अस्मिता जागी आहे अशा लोकांच्या समुहाला मी राष्ट्र म्हणतो."

आता राष्ट्रीय एकात्मता म्हणजे राष्ट्राविषयी ऐक्य, राष्ट्रावर निष्ठा, राष्ट्रावर प्रेम, देशभक्ती, दुसऱ्याला टोचलं तर मला कळ यावी. पण आम्हा भारतीयात ती प्रवृत्ती नाहीच. उलट दुसऱ्याला टोचल्यानंतर आपल्याला मज्जा वाटते. मग येईल का आमच्यात राष्ट्रीय एकात्मता ? स्वार्थी

राजकारण, सत्तापिपासु लोक ह्यांच्यामुळे तरी आज राष्ट्रीय एकात्मता नष्ट होत चाललीयं. जो तो स्वतःच्या पोळीवर लोणी ओढायला लागलाय. त्यांना राष्ट्र म्हणजे काय माहीतच नाही. आपण राष्ट्रासाठी नसून राष्ट्र आपल्यासाठी आहे ही भावना वाढत चाललीय. पंजाबमधील प्रत्येक शाळेत हेच शिकविलं जातय की, पाक के लिए पाकिस्तान है, हिंदूओंका हिंदूस्थान है, तो शिखों के लिए खलिस्तान क्यो न हो । बलविंदर उठाओ ये बंदूक और ले लो खलिस्तान । आणि मग त्या बलविंदरच्या बंदुकीतून सुटणाऱ्या असंख्य गोळ्यांच्या वर्षावात भारत रक्तात न्हातोय. कशी येईल मग राष्ट्रीय एकात्मता ?

स्वातंत्र्यानंतर भारताने अनेक क्षेत्रात प्रगती केली. पण आपणच निर्माण केलेल्या समस्यांनी या प्रगतीला मागे टाकले. प्रगतीची निर्देशक असणारी अनेक दर्जेदार विद्यापीठे आपण स्थापन केली. पण त्यांच्या नावातही हिंदू, कोठे मुस्लीम हे शब्द आले. तुम्हीच सांगा, शिक्षणाला जात असते का ? धर्म असतो का ? शिक्षणाची, ज्ञानाची हिंदू-मुस्लीम अशी निवड होते का ? इंग्रजांनी या शब्दांचा वापर सुरू केला. ही पद्धत आपण मोडायला हवी होती. पण तसे झाले नाही. सैन्यातील भरती करतानाही आपण ती जातीनुसार करण्याची पद्धत चालू ठेवली. त्यामुळे आपण एकमेकापासून दूरावत आहोत. सरकारी नोकऱ्यातही आज आम्ही भेदभाव करू लागलो आहे. नोकरीसाठी निकष शिक्षण हाच हवा होता. परंतु जातीचा निकष लावला जातो. मग ह्या भेदातून आपल्या देशाचे व्यक्तीमत्व कसे साकारू शकेल ? कोटींच्या संख्येवर असलेल्या या आपल्या देशात हजारो लोक जेवढ्या अधिकारवाणीने आपला हक्क सांगतील तेवढ्याच अधिकारवाणीने समाजातला सर्वसामान्य माणूसही आपला हक्क सांगू शकला पाहिजे. पण आज आपल्यातल्या समस्या उग्र रूप धारण करीत आहेत. कोणी धर्माच्या नावावर तर कोणी भाषेच्या नावावर अलग होण्याची भाषा करतो आहे. आणि आपल्या घरातील हे हेवे-दावे पाहून इतिहासाची पुनरावृत्ती होईल ही मला भीती वाटते. कारण यावेळी गांधी, नेहरू, टिळक, बोस आणि हसत - हसत फासावर जाणारे भगतसिंग मिळणार नाहीत. आणि मग ह्या देशाची अवस्था रेल्वे फलाटवर पडलेल्या मड्यासारखी होईल आणि ती न होऊ देणे हे आपले आद्य कर्तव्य आहे.

त्याचप्रमाणे भारताचे गौरव उद्‌गार काढताना स्वामी विवेकानंद आपल्या कोलंबोमधील भाषणात म्हणाले होते "आज मी आपल्या समोर ठासून सांगतो की, हे सत्य आहे, नितांत सत्य आहे. त्रिवार सत्य आहे. सूर्यप्रकाशा इतपत स्वच्छ आहे की, जर पृथ्वीच्या पाठीवर अशी कोणती भूमी आहे की जिला पुण्यभूमी हे अन्वर्थक नाव यथार्थपणे देता येईल. जर असे कोणते एखादे स्थान आहे की जिथे माणसात दया, क्षमा, कोमलता, सुचीता, प्रभूती सदगुणांचा इतर कोणत्याही देशापेक्षा जास्त विकास झाला आहे. अशी कोणती भूमी आहे की जिची संस्कृती महान आहे. जर अशी कोणती भूमी असेल की जिला अंर्तदृष्टीचे व अध्यात्मिकतेचे माहेरघर म्हणता येईल तर ती माझी, तुमची, आमची, सर्वांची मायभूमी भारत होय " या भारतासाठी लाखोगणिक लोकांचे उडालेत हाहाकार, उसळलेत अनाथ बालकांचे चित्कार, अन वाहिले दीन विधवांचे अश्रू आणि म्हणून त्यांच्या आत्म्याला शांती मिळण्यासाठी राष्ट्रीय एकात्मता ही काळाची गरज आहे.

**काश्मीर हो या कन्याकुमारी,**
**भारत ये माँ हमारी**

**गुजरात हो या गुवाहट्टी, एक अपना देश,**
**एक अपनी मिट्टी**

# नव्या वर्षाचे आव्हान स्वीकारू या !

सदाशिव बी. पालकर
बी.ए.- २

नुकतेच संपलेले १९९२ हे वर्ष भारताच्या इतिहासात अनेक दृष्टीने संस्मरणीय राहील. संपता संपता या वर्षाने देशासाठी एक अत्यंत गंभीर असे आव्हान मागे ठेवून आपला निरोप घेतला.

तशा या वर्षात अनेक महत्त्वाच्या घटना घडल्या पण राष्ट्राच्या जीवनाच्या दृष्टीने चार गोष्टी निर्णायक महत्त्वाच्या धरायला हरकत नाही. शेअर घोटाळा उघडकीस येणे, पोलाद व खतांच्या किंमतीचे नियंत्रण उठल्याने आणि पेट्रोल,डिझेलची शासकीय भाववाढ झाल्याने महागाईला नवी चालना मिळणे, सुप्रीम कोर्टाने मंडल आयोगाच्या शिफारशींना मान्यता देणे आणि शेवटी बाबरी मशीद कारसेवकांनी उद्ध्वस्त केल्यामुळे देशात जातीय दंगलीचा वणवा पेटणे इत्यादी.

शेअरबाजारातले बडे दलाल आणि बड्या देशीपरदेशी बँकांचे बडे अधिकारी यांनी संगनमत करून कित्येक हजार कोटी गिळंकृत केल्याच्या अति बड्या घोटाळ्याला एप्रिलमध्ये वाचा फुटली. अगोदर वर्षभर या मंडळींनी हेराफेरी करून गगनात चढवलेले शेअरचे भाव २८-एप्रिलला खाडकन खाली कोसळले. देशाच्या पैशाची राजरोस लूट करणाऱ्या आणि जगभर देशाला बदनाम करणाऱ्या या गोष्टी १९९२ या वर्षी घडल्या.

नव्या आर्थिक धोरणांनी जनताविरोधी वाटचाल चालू राहिली. ४ जानेवारीला पोलादाचे निर्नियंत्रण झाले. २६ ऑगस्टला खतांचे निर्नियंत्रण झाले आणि १५ सप्टेंबरला पेट्रोल गॅसच्या किंमती वाढल्या.

१६ नोव्हेंबरला सुप्रीम कोर्टाने निर्णय देऊन अन्य मागासवर्गीयांना २७ टक्के राखीव जागा देण्याचा आदेश वैध ठरविला. ६ डिसेंबरला कार सेवकांनी बाबरी मशीद उद्ध्वस्त केल्यामुळे देशात जातीय दंगली पेटल्या. यात ११०० हून अधिक जीवांची हत्या झाली. कित्येक हजार कोटींचे नुकसान झाले. पण त्याहून अधिक भयावह गोष्ट म्हणजे भारतीय जनतेची उभी फाळणी होण्याचा धोका निर्माण झाला.

या वर्षी घडलेली आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे दक्षिण भारतात आलेले वादळ. या वादळाने केरळ व तामिळनाडू या राज्यांना चांगलेच झोडपून काढले. यात थिरुअनंतपूरम्,पठणमनिट्टा,इडुक्की हे केरळमधील जिल्हे वादळात सापडून जास्त नुकसान झाले.

हे १९९२ ने ठेवलेले मुख्य आव्हान आहे. शतकानुशतके माणुसकीविरहीत भेदभावाने गांजलेल्या, पोटभर अन्न, वस्त्र आणि डोईवर छप्पर यांना वंचीत असलेल्या कोट्यावधी कष्टकरी जनतेला समतेच्या, सुखी आणि संपन्न जीवनासाठी ऐक्यबद्ध करा. हा संदेश मावळते वर्ष उगवत्या वर्षाला देऊन गेले आहे.

हे आव्हान आम्ही स्वीकारत आहोत.

# मुरडणाऱ्या नाकाकडे लक्ष द्यायला वेळ कुठे ?

विजयकुमार दि. कांबळे
बी.ए.- २

आजचे युग गतिमानतेचे युग आहे. संपूर्ण मानवी जीवन हे घड्याळाच्या सेकंद काट्यावर हुकूम म्हणण्यापेक्षा त्याच्याही पुढे पळण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याला पर्याय नाही. त्यामुळे धावण्याची फॅशन, चालण्याची फॅशन, बसणे, उठणे, खाणे-पिणे व पेहराव या प्रत्येक गोष्टीचीच फॅशन होऊन बसली आहे. फॅशनने आपले अवघे जीवन व्यापून टाकले आहे.

पेंद्याने एकदा भगवान श्रीकृष्णाला विचारले, "देवा, इतक्या साऱ्या सोळा सहस्त्र एकशे आठ गोपी आपणास कशाला ? त्यातील एखादी मला देऊन टाका ना !" तेव्हा भगनाव श्रीकृष्ण म्हणाले, "मी ज्या रंगमहालात नसेन त्या रंगमहालाचा तू स्वामी हो". परंतु कसचे काय ? जाईल त्या प्रत्येक महालात गोपीशी भगवान हितगुज करीत असलेले पेंद्याला दिसले आणि मग मात्र पेंद्याला श्रीकृष्णाच्या लीलेची कल्पना आली.

तद्वत फॅशन नाही असे ठिकाण आणि क्षेत्र आपल्याला शोधूनही सापडणार नाही. इतकी ही फॅशन सार्वत्रिक होऊन राहिली आहे.

'जुने जाऊ द्या मरणालागूनि ।

जाळून किंवा पुरुनि टाका सावध ऐका ।

पुढल्या हाका ॥'

असे कवी केशवसूत म्हणतात. जुने हे नेहमीच नवीनास नावं ठेवते, नाक मुरडते. अर्थात नव्याच्या प्रत्येक गोष्टीतील उणे-दुणे काढणे, त्यांना नाक मुरडणे ही समाजातील लब्ध प्रतिष्ठित म्हणविल्या जाणाऱ्या जुन्यांची फॅशनच झाली आहे. सप्तरंगी इंद्रधनुष्याप्रमाणे लवलवणारी ही तरुण अल्लड फुलपाखरे पाहिली रे पाहिली की, या जरठ म्हाताऱ्यांच्या व संस्कृती रक्षकाच्या पोटशूळाला उधाण आलेच म्हणून समजावे.

वेगवेगळी वस्त्रे, प्रावरणे, सौंदर्यप्रसाधने वापरणे, त्याची लयलूट करणे हा तरुण-तरुणी यांचा प्रथम हक्क आहे. स्वत: स्वच्छही होऊन इतराना आनंदी करण्याच्या त्यांच्या प्रांजळ प्रयत्नांना तुम्ही का खीळ घालता ? स्लीवलेस, चित्र - विचित्र पोशाख, नयनरम्य डिझाईन्स ही आजची काळाजी गरज आहे. आजची फॅशन्स कालपरत्वे बदलत आलेली आहे. फॅशन नेहमीच कालसापेक्ष असते आणि जे कालसापेक्ष असते तेच टिकते. फॅशन ही जीर्ण मतवादी यांच्या मताप्रमाणे कधीच नष्ट होत नाही. तर नवनवीन स्वरूपात ती विकसित होते. तिचे रंग, ढंग, रूपामध्ये ती सतत उत्क्रांत होत असते.

## व्यक्तिमत्व खुलविण्यासाठी

नाविन्याचा सोस आणि हव्यास हा मानवाचा स्थायीभाव आहे. हा हव्यासच नसता तर ? वस्त्र - प्रावणातील नवनवीन शोध आणि सौंदर्यप्रसाधनाचे आविष्करणच झाले नसते. Style is the man. असे आपण म्हणतो ते याचसाठी की, आपले उत्तम किंवा 'सुमार' व्यक्तिमत्व खुलविण्याचा प्रयत्न करतो ते अत्युत्तम वस्त्र - प्रावरणे व सौंदर्यप्रसाधनांच्याच साह्याने ना !

जीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये जीवघेणी स्पर्धा आहे. नोकरी उद्योगधंदे किंवहुना लग्नाच्या बाजारात सुद्धा कोण स्पर्धा आहे ! अशावेळी इतरांवर प्रभाव पाडण्यासाठी

थोडीशी फॅशन केली; सौंदर्य प्रसाधने वापरली तर बिघडली का संस्कृती ? समजा फॅशनच्या अवलंबनाने एखादी सुमार 'ठकी' किंवा यथातथा 'गंगाराम' जीवनात यशस्वी होण्याचा, लग्नाच्या बाजारात विकले जाण्याचा प्रयत्न करीत असतील तर बुजूर्ग म्हणविल्या जाणाऱ्यांनी नाके मुरडण्याची काय हो गरज ? आणि आजचा जमाना तुमच्या मुरडलेल्या नाकाकडे लक्ष द्यायला कुठे मोकळा आहे ? प्रत्येक जण स्वतःमध्ये गुंतला आहे. कालचक्राशी बांधला आहे.

पोटशूळ कशासाठी ?

छीः ! छीः ! काय ही आजकालची पोरटी ? काही लाज-लज्जा आहे का थोडी ? काय ते कपडे अन् काय ते ध्यान । असा आरोप करणारी एक तर तोंडाचे बोळके झालेली, किंवा पाठीला पोक आलेले पिचपिच्या डोळ्यावर चष्मा परिधान केलेले आजोबा किंवा आजीबाईच असणार. आजच्या युवकांचे हे रंगीबेरंगी, वेगवेगळी डिझाईन्स व फॅशन असणारे कपडे पाहून यांना किळस वाटते. पण हे नाक मुरडणारे लोक हे लक्षात ठेवीत नाहीत किंवा आपल्याला ही हौस-मौज करता येत नाही हे दुखणे किंवा कृतकूकोप ते तरुणांवर पाखडीत असतात.

म्हणून फॅशनला नाक मुरडणाऱ्यांना असा सल्ला आहे की, ही फॅशनला नाके मुरडण्याची फॅशन तुम्ही रद्दबादल करा. अन्यथा ही नवीन पिढी तुमच्या नाकावर टिच्चून नवनवीन फॅशनचा भडीमार करतील आणि मग 'मुरडण्याला' तुम्हाला नाकच शिल्लक राहणार नाही म्हणून एवढेच -

'स्वातंत्र्य आहे फॅशनचे ।

जो जो करील तयांचे ।

चित्र विचित्र पोशाख लेवूनि ।

संजय, सलमान होण्याचे ।

मुग्ध नवोढा तरुणींना ।

जुही - श्रीदेवी होण्याचे ॥



# वशिला

लहू आंगज
बी.ए. भाग -३

पूर्वी थोडेफार शिक्षण झालेल्या व्यक्तीस सुद्धा नोकरी मिळायची पण सध्याच्या या वाढत्या लोकसंख्येमुळे प्रत्येक व्यक्तीला जास्त प्रमाणात नोकरीची गरज भासू लागली. पण - प्रत्येक ठिकाणी वशिला. आज गरीबीत जीवन जगत असताना ह्यातूनच तो आपलं शिक्षण घेतोय, पदवीधर होतोय आणि वशिल्या शिवाय बेकार राहतोय शेवटी हा पदवीधर युवक बेकारीला कंटाळून म्हणतोय "ज्याचा आहे वशिला तो जाईल काशीला आणि ज्याचा नाही वशिला तो जाईल फाशीला." आपण व्यवहारात एक गोष्ट ऐकत असतो. एकजण म्हणतो, मला मामलेदार कचेरीत जायचं आहे तर दुसरा म्हणतो मला जिल्हा न्यायालयात जायचं आहे. माझं एक महत्त्वाचं काम आहे. होतंय का बघू या पण तिसरा म्हणतो, त्या ऑफिसमध्ये तुझ्या ओळखीचा किंवा नातेवाईकापैकी कोण आहे काय ? तरच तेथील काम होईल नाहीतर काम होणं अवघड आहे. हे आपणास नेहमी ऐकावयास मिळते. एखाद्या ठिकाणी नोकर भरती आहे अशा ठिकाणी वशिला हा किती समाजविघातक आहे याची जाणीव येते.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यापूर्वी म्हणजे पारतंत्र्यात असताना आपण आपला देश स्वंतत्र, सुजलाम्-सुफलाम् होईल अशी स्वप्ने पहात होतो. पण सध्या व्यवहारात असे दिसते की भ्रष्टाचाराची व वशिलेबाजीची भरमसाठ वाढ होत आहे. भ्रष्टाला व वशिलेबाजीला कोणतीही एखादी व्यक्ती जबाबदार नाही. आम्ही सर्व भारतीय या गोष्टीला जबाबदार आहोत. कारण प्रत्येकजण आता काम केल्या बद्दलचा मोबदला घेत आहे. ह्या पद्धतीला आम्ही - तुम्ही जबाबदार आहोत. पण आपल्या पैकी एकही व्यक्ती असे म्हणायला तयार होत नाही. आजकाल जीवन इतके गुंतागुंतीचे झाले आहे की प्रत्येकाला या भ्रष्टाचाराच्या जाळ्यातून बाहेर पडणे अशक्य झाले आहे. पण या वाढत्या लोकसंख्येमुळे मानवाच्या ज्या जीवनावश्यक वस्तूत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आपणास पहावयास मिळते. अशी अनेक कारणे या मागे आहेत. पण रोजगार सुद्धा मोठ्या प्रमाणात राबवणे सरकारी यंत्रणेला अवघड आहे.

प्रत्येक व्यक्ती ही आपल्याला अत्यावश्यक असणाऱ्या गोष्टी मिळविण्यासाठी चढाओढ करीत असतो. या चढाओढीत विजय संपादन करण्यासाठी प्रत्येकजण कसोशीने प्रयत्न करीत असतो. त्यासाठी दोन पैसे द्यावे लागले तरी तो माघार घेत नाही. पण अशावेळी ज्या लोकांना पोटभर अन्न व अंगावर कपडे मिळत नाहीत. त्याच्या परिस्थीतीचा विचार करायला हवा. उच्चवर्णीय लोकच या संधीचा फायदा मिळवतात त्यामुळे सामान्य लोकांचे जीवन अक्षरशः धुळीस मिळते. अशा तऱ्हेनेच भ्रष्टाचार व वशिलेबाजीचा उगम होतो व समाजाच्या मानगुटीवर बसतो अशा परिस्थीतूनच ग्रासलेली जनता समाजविघातक कृत्याकडे वळू शकते व उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. यामध्ये पैसेवाल्यांचे हाल न होता गरीब जनतेची आर्थिक पिळवणूक होते. कारण त्यांच्याजवळ 'पैसा ना वशिला' त्यांचा कैवारी कोणी नाही. त्याला अनेक अडचणीत राहून काबाडकष्ट केल्याशिवाय पर्याय नाही.

नोकरी, कोर्ट-कचेरी, गुन्हेगारी यात वशिलेबाजी शिपायापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत. आता तर 'मेन बॉसपेक्षा' शिपायाच्या पाया पडावे लागते. ऑफिसमध्ये आपले 'Boss' असताना सुद्धा शिपाई एखाद्या

प्रामाणिक व्यक्तीला ते नाहीत म्हणून सांगतो. कारण त्यालाही पैशाची चटक लागलेली असते. अशा वेळेला श्रीमंतच श्रीमंत होतो व गरीब मात्र गरीबच राहतो. या दोन वर्गाचे अंतर मात्र फारच वाढत चाललेले आपणास पहावयास मिळते. फरक इतकाच की, पैशाच्या जोरावर श्रीमंत आपली कामे ताबडतोब करतो. गुन्हेगारीतून मोकळे होतो, कोर्टात आपल्या बाजूने निकाल लावून घेतो आणि गरीब मात्र हे सर्व कपट कारस्थान उघड्या डोळ्यांनी पहात असतो. कारण त्याच्याजवळ 'ना पैसा ना वशिला' !

यावर उपाय एकच, गरीब जनतेने आपापसातील हेवेदावे विसरून ही वशिलेबाजी व भ्रष्टाचाराचा 'राक्षस', समाजाला लागलेला कलंक मुळासह उखडून काढण्यासाठी आपण एकत्र आले पाहिजे व सरकारला साथ दिली पाहिजे. यातच समाजाचे कल्याण आहे आणि व्यक्तीचेही. यातूनच सर्वांचे कल्याण होऊन भारत पूर्वीसारखा सुजलाम्-सुफलाम् होईल.



# माझा भारत महान ?

चंद्रकांत पोवार
बी.ए. भाग - २

प्राचीन काळापासून भारत वर्ष या नावाने ओळखला जाणारा भारत हा खंडप्राय देश विविधतेने नटलेला आहे. भारत हा संस्कृतीप्रधान देश आहे. आपल्या देशाची संस्कृती जगामध्ये सर्वश्रेष्ठ आहे. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या विशाल देशात विविध प्रकारचे नमुने आपल्याला पहायला मिळतात. आपल्या देशात विविध जातींचे, धर्मांचे, पंथाचे लोक राहतात. तसेच आपल्या देशात वेगवेगळ्या भाषासुद्धा बोलल्या जातात. भारत हा बहुभाषिक देश आहे. मानवाच्या जीवनपद्धतीच्या व भौतिक पर्यावरणाच्या निकटच्या संबंधामुळे भारतीय जीवनात देखील विविधता दिसून येते.

१५ ऑगस्ट १९४७ या दिवशी परकीय गुलामलगिरीतून मुक्तता होऊन भारताला स्वातंत्र्य मिळाले. आपल्या स्वातंत्र्यासाठी अनेक थोर नेत्यांनी, देशभक्तांनी, वीरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या परिश्रमाने आपणा सर्वांना स्वातंत्र्य (आपल्या देशाला) मिळाले. गांधीजींच्या सत्य आणि अहिंसा या तत्त्वांचा अवलंब करून जगामध्ये शांतताप्रिय देश म्हणून भारताने सर्वोच्च मान मिळविला आहे. जगामध्ये आंतरराष्ट्रीय सामंजस्य आणि शांतता राखण्यासाठी सक्रिय सहभाग घेऊन संयुक्त राष्ट्रसंघामध्ये भारताने प्रवेश केला आहे. 'सर्व धर्म समभाव' या तत्त्वाचा पुरस्कार केलेल्या भारताला शांतीदेश म्हणूनही संबोधले जाते. परंतु याच शांतीप्रिय देशामध्ये अलीकडे काही देशविघातक शक्ती एखाद्या बांडगूळाप्रमाणे वाढलेल्या आहेत, वाढत आहेत. या शक्ती देशात दहशत बसवण्यासाठी किंवा आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी विनाकारण हिंसाचार घडवून आणत आहेत. या शक्तीमुळे आपल्या देशाच्या अखंडत्वास तडा जात आहे आणि म्हणूनच स्वार्थी व गुंड प्रवृत्तीच्या लोकांना वाव मिळाला आहे. विद्यार्थी, कामगार, शेतकरी, कर्मचारी आणि राजकीय (काही) पक्षांचे अनुयायी इत्यादींच्या विविध मागण्यासाठी अधिकाअधिक हिंसात्मक आदोलनाचा वापर केला जात आहे. संप, मोर्चा, घेराव, निषेध यांचे नेतृत्व विचारी माणसांच्या हाती न राहता विद्ध्वंसक आणि देशद्रोही लोकांच्या हाती गेलेले आहे. जनतेच्या भावना चेतवून राष्ट्रहीत डावलले जात आहे. अशी कृत्ये कामयमपणे होत आहेत. यामध्ये तरुणांना मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेतले जात आहे.

आज सर्वांगीण प्रगतीवर असलेल्या जपान देशात संप करताना केवळ निषेध म्हणून काळ्या फिती लावून काम चालूच ठेवले जाते. निषेध करत असताना देशाचे हितसुद्धा पाहिले जाते. मात्र आपल्या देशामध्ये ही हिंसात्मक आंदोलने एकीकडे राष्ट्रीय संपत्तीची हानी करत आहेत तर दुसरीकडे राष्ट्रीय एकात्मता धोक्यात आणणाऱ्या विद्ध्वंसक कृत्यांचा आदर्श तरुणापुढे ठेवत आहेत. आपल्या देशामध्ये जवळ - जवळ सर्व क्षेत्रामध्ये ही हिंसात्मक लाल फितीचा कारभार चालत आलेला आहे. आपले भारतीय राजकारण हे स्वार्थाने बरबटलेले आहे. सत्ता उपभोगण्यासाठी अत्यंत वाईट मार्गाचा देखील अवलंब केला जातो. जाती, धर्म, भाषा, प्रांत या गोष्टींना खतपाणी घातले जात आहे. या सर्व घटनांशी सर्वसामान्य माणूस हैराण झालेला आहे. या भ्रष्टाचारी प्रवाहात तो गंटागळ्या खाऊ लागला आहे. लोकशाहीच्या स्वतंत्र भारतात या सामान्य माणसाला त्याच्या जिवाची भीती

# प्रेम एक परीक्षण

मुसळे के. व्ही
बी.ए. भाग - ३

आपल्या मानवी जीवनामध्ये प्रेम हा एक अविभाज्य घटक आहे. आणि 'प्रेम' हा अद्‌भूत असा रसहीन शब्द जरी साहित्यातून परावृत्त केला तरी जगातील कित्येक साहित्य निरुपयोगी ठरून कथा, कादंबऱ्या यांना काही अर्थच राहणार नाही. उन्हाळ्यातील नदीप्रमाणे चित्रपट आणि कविता संग्रह आटून जातील.

'तारुण्य' हा या मानव प्राण्यास निसर्गाने अद्‌भूत असा वर दिलेला आहे. आणि तारुण्याने बहाल केलेली सर्वश्रेष्ठ देणगी म्हणजे "प्रेम" होय. प्रेम हे अनेक बाबीतून आढळून येते. आईने मुलावर केलेले प्रेम, पत्नीने पतीवर केलेले प्रेम. अशी कित्येक उदाहरणे देता येतील पण, तरुण - तरुणीच्या प्रेमाची रुची काही वेगळीच आहे. ते प्रेम म्हणे आंधळे असते. ते कोणावरही चटकन बसते. मग ते वात्सल्ययुक्त, वासनायुक्त किंवा एकतर्फी असो.

तरुण - तरुणी प्रेमात पडल्यावर दोघांनाही एकमेकाविषयी आस्था निर्माण होते. क्षणाक्षणाला एकमेकांची आठवण येऊन वारंवार भेटावेसे वाटते. भेटणे शक्य नसल्यास एकमेकांना न्याहाळणे आणि योगायोगाने भेट घडून आलीच तर निष्फळ विषयावर गळ्यात गळा घालून तासनतास बोलत राहणे. त्यावेळी चोरटे स्पर्श करताना हे बोलणे कधीही संपावेसे न वाटणे मग इतर कशातही मन रमत नाही. परिणामतः कॉलेजच्या अभ्यासाचे खोबरे _

प्रेमात घरच्यांचा विरोध नसेल तर त्यातील मजाच निघून जाते. ही मजा मुद्यावरून गुद्यावर सुद्धा येऊ शकते. आपले आईवडील विवाहाला परवानगी देणार नाहीत याची त्यांना खात्री असते. मग काय ? विरहाची कल्पना सहन होत नाही. त्यातच चित्रपट, कादंबऱ्या, दूरदर्शन ही प्रसारमाध्यमे खतपाणी घालतात. मग कोणी नोंदणी पद्धतीने विवाह करतात, तर कोणाला पळ काढावा लागतो. खरे तर हा पूर्णपणे भोळसटपणा आहे. हे 'शुभमंगलम्' झाल्यानंतर समजते. लग्नानंतर सर्वांचेच वैवाहिक जीवन सुखी होईल असे नसते. घोडे समजून पूर्णपणे गाढवावर बसण्याचा प्रकार घडतो. प्रेमकलहाचे भांडणात व भांडणाचे घटस्फोटात रूपांतर होऊन आनंदाचा शेवट होतो आणि दुःखाच्या दाट छायेला सुरुवात होते.

काहींच्या बाबतीत प्रेमभंग होतो, काहीजण दुःखात डुंबतात, नैराश्य, झोप न येणे, कामात लक्ष न लागणे, जगण्यास अर्थ नाही असे बोलणे, चिडचीड, आदळ आपट, अबोल राहणे हे आलेच. विरहामुळे धुम्रपान, मद्यपानात गुंतणे असे प्रकार आलेच. मग कोणी आत्महत्येच्या आहारी जातात आणि नवे रोमिओ-जुलियट, लैला-मजनू तयार होतात आणि वृत्तपत्रांना मसाला पुरवितात.

हे सर्व पाहिल्यावर प्रश्न पडतो की, प्रेमामुळे केवळ दुःखच मिळते का ? प्रेम म्हणजे तरी काय ? एकमेकाविषयीचे प्रेम म्हणजे प्रेम का ? इच्छित वस्तू मिळेपर्यंत टिकणारे वेड म्हणजे प्रेम का ? याचे उत्तर म्हणजे प्रेम हे नसतेच मुळी. हा आकर्षणाचा भाग असतो. या तरुण वयात तरुण - तरुणी यांना एकमेकाविषयीचे शारीरिक आकर्षण वाटते. आकर्षण पटकन निर्माण होते. तसे खऱ्या प्रेमाचे नाही. खरे प्रेम ही बौद्धीक गरज असते.

ती निर्माण करावी लागते. खऱ्या प्रेमाचे रेशमी बंध, जुळायला अवकाश लागतो. ओळख, आकर्षण, मैत्री, सहवास, प्रेम, विवाह असा टप्प्या-टप्प्याने प्रवास घडायला पाहिजे. खरे प्रेम लग्नापूर्वी करावे असे नाही तर ते लग्नानंतरही करता येते. कारण ते निर्माण करावयाचे असते.

खऱ्या प्रेमासाठी त्याग, आदर, विश्वास, तडजोड, सहकार्य एकनिष्ठता या गुणांची आवश्यकता असते. जोपर्यंत 'प्रेम' म्हणजे काय ? हे कळत नाही. तो पर्यंत पूर्वीपासून चालत आलेली "विवाह" ही संकल्पनाच उपयुक्त आहे.



# आजचा विद्यार्थी

दत्तात्रय जाधव
बी.ए. भाग - १

आपल्या भारत देशामध्ये अगदी अनादिकालातील ऋषीमुनीपासून गुरु व शिष्य हे नाते अस्तित्वात आहे. पूर्वी ऋषीमुनी घोर तपश्चर्या करीत व विद्या प्राप्त करीत व परत त्यांच्याकडून इतर शिष्य विद्यार्जन करत असत. विद्यार्थी म्हटले की ज्ञानाचा भुकेला, विनयशील, काहीतरी नवीन निर्मितीचा शोध घेणारा विद्यार्थी आपल्या नजरेसमोर उभा राहतो. परंतु २१ व्या शतकातील आजचा विद्यार्थी पाहिला की, मन अगदी विषण्ण होऊन जाते. खरंच आजचा विद्यार्थी हा खऱ्या अर्थाने विद्यार्थी राहिला का ? असा प्रश्न सर्वप्रथम माझ्या मनःचक्षुसमोर उभा राहतो आणि मी विचाराच्या वादळात सापडतो. सध्याच्या या सर्व परिस्थितीत हा विद्यार्थी कसा आहे व तो असा का याची कारणमीमांसा करणे जरूरीचे आहे.

पूर्वी आपल्या देशात दारिद्रय व अज्ञान यामुळे शिक्षणाचा व्हावा तसा प्रसार व प्रचार होऊ शकला नाही परिणामी ज्यांना शिक्षणाची संधी मिळत होती ते त्या ज्ञानाचा परीपूर्ण लाभ घेत असत व आदर्शवादाचे प्रतीक म्हणून ते समाजात वावरत असत. परंतु कालांतराने म.फुले, डॉ. आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, आगरकरांसारख्या विभुतींनी अथक परिश्रम घेऊन शिक्षणाचा प्रसार केला. आपल्या भगीरथ प्रयत्नांनी ज्ञानाची ही गंगा अगदी खेड्यापाड्यात पोहचवली. घराघरातून ज्ञानाचे दिवे लावले गेले प्रत्येक विद्यार्थी तळमळीने व तन्मयतेने विद्या प्राप्त करून घेत होता. परंतु जसजसी शिक्षण पद्धतीत सुधारणा होत गेली तसतसा विद्यार्थी बदलत गेला आणि सद्य परिस्थितीत तर शिक्षण हे पोटार्थी झाले आहे. पोटासाठी नोकरी व नोकरीसाठी शिक्षण हे समीकरण रूढ झाले आहे. गुरु व शिष्य यामधील परमपवित्र नाते तर आजचा विद्यार्थी पूर्णपणे विसरला आहे. आजचा विद्यार्थी दिवसेंदिवस सुख लोलूप होत चालला आहे असे मी तरी म्हणेन.

आजचा विद्यार्थी अंधारातून प्रकाशाकडे जाण्याऐवजी अंधःकाराच्या गर्तेकडे झपाट्याने वाटचाल करीत आहे. 'विद्या विनयेन शोभते' या तत्त्वाचा लवलेशही आजच्या विद्यार्थ्याच्या अंगी दिसत नाही. गुरु आणि शिष्य हे नातेच संपुष्टात आले आहे. आजचा विद्यार्थी अनाचार आणि व्यसनाधीनता यांच्यामध्ये जास्तीत जास्त बळी पडताना दिसतो आहे. पालकांच्या नजरेत धुळफेक करून आजचा विद्यार्थी त्यांची कष्टाची कमाई हवा तसा उधळतो आहे. आजचा विद्यार्थी फॅशनच्या फेऱ्यात अडकलेला दिसतोय. पाश्चात्य संगीताच्या तालावर रॉक आणि ब्रेक करण्यात तो स्वतःला धन्य समजतोय. कुणी काय खावे, कुणी काय प्यावे, काय नेसावे याला ताळतंत्रच उरलेले दिसत नाही. सामाजिक बांधीलकी आणि नीतिमत्ता यांच्या पलीकडे आजचा विद्यार्थी पोहचला आहे. नवनिर्मितीचे वेध लागलेला, ज्ञानलालसा ही प्रणालीच आजच्या विद्यार्थ्याने बदलली आहे. मनुष्य जन्माला आला की त्याचा पहिला संबंध मातीशी येतो व तो शेवटपर्यंत अतूट असतो. परंतु आजच्या विद्यार्थ्याने मातीशीच नाते तोडले आहे. त्यांच्यामध्ये कष्ट करण्याची जिद्द नष्ट झाली आहे. दारू, जुगार, गर्द यांच्या विळख्यात आजचा विद्यार्थी सापडला आहे. आजचा विद्यार्थी ज्ञानाच्या क्षेत्रात बिन शिडाच्या जहाजाप्रमाणे दिशाहीन भटकतोय. आजचा विद्यार्थी वैचारिक तत्त्वांना, ज्ञानलालसेला बगल देऊन केसांची

झुलपे राखीत, सिगारेटच्या धुराच्या वलयात एकाम होताना दिसतोय ही फार खेदाची गोष्ट आहे. याला कुठेतरी पायबंद घातला गेला नाही तर – ज्याच्या खांद्यावरून उद्याच्या उन्नत भारत मातेची पालखी वाहिली जाणार आहे ती अर्ध्यावरच सोडल्याशिवाय तो राहणार नाही. ज्यांच्या छातीवर उद्या आदर्श भारताची इमारत मोठ्या डौलाने उभी राहणार आहे तो पाया म्हणजे युवक, विद्यार्थी ज्ञानामध्ये परिपूर्ण असला पाहिजे. नाविन्याचा शोध घेण्यामध्ये तो गर्क असला पाहिजे. त्याने थोर व्यक्तीचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून वाटचाल केली पाहिजे.

सामाजिक आणि राजकीय बाबतीत विचार करताना आजच्या युवक विद्यार्थ्याला योग्य मार्ग दाखविण्याचे कार्य आज सामाजिक आणि राजकीय घटक यांच्याद्वारे झाले पाहिजे. म्हणूनच आजच्या विद्यार्थ्याने आळस, अनाचार आणि व्यसनाधिनता यांचे चक्रव्यूह तोडून बाहेर पडले पाहिजे. एका आदर्श भारताच्या नवनिर्मितीसाठी ! त्याने सतत प्रयत्नवादी राहिले पाहिजे, जिद्दीने आणि चिकाटीने काम केले पाहिजे. तो हाय - फाय प्रेमाच्या भुकेपेक्षा ज्ञानाचा भुकेला राहिला पाहिजे. आजच्या विद्यार्थ्याने 'सुखार्थिना कुती विद्या, विद्यार्थीना कुतो सुखम् ! या तत्त्वाचा अवलंब करून आदर्शवादी विद्यार्थ्यांनी भूमिका पार पाडली पाहिजे.

---



# कविता

## थोडी फुले घेवून जा

भेटल्यानंतर काहीतरी थोडेतरी बोलत जा
वारा आला वसंताचा फुले थोडी घेऊन जा.

भेटल्यानंतर हसत नाहीस
हसल्यानंतर थांबत नाहीस
काळोखातून गेलीस तर
जाता-येता, मागे-पुढे कोण आहे बघत जा.

उधळणाऱ्या वाऱ्यावरती
झाडांचीही गस्त आहे
चंद्र अजून गावाबाहेर उभा आहे
इथे तोवर एक शब्द देवून जा.

जमले नाही एवढे तर
हातावरचे दोन तळवे
माझ्या पुढे उघडे कर
डोळे माझे विझल्यानंतर माती मला देवून जा,
वारा आला वसंताचा थोडी फुले घेऊन जा.

मनवेल ऊर्फ जॉन फर्नांडीस
बी.ए. भाग - १

## प्रयत्न

पहिल्याच पायरीवरून
घसरत होता पाय माझा
प्रयत्न करत होतो मी
पाऊल पुढं टाकण्याचा
श्वासात श्वास रोखून
धीटपणानं उभं राहण्याचा
आधारान दिला धोका
निराधार झालो होतो मीं
पुन्हा पुन्हा प्रयत्न करतोय
पाऊल पुढं टाकण्याचा
तरीपण –

पहिल्याच पायरीवरून
घसरत होता पाय माझा
अखेरीस
हे माहीत असतानाही –
मला अख्खा डोंगर गिळायचा होता.

गोरे एम. ए.
बी. एस्सी. भाग - १

## जीवन

जीवन ! जीवन ! जीवन !
या तीनच शब्दांनी टाकले आकाश व्यापून
कुणी म्हणे जीवन म्हणजे आनंद
कुणी म्हणे जीवन म्हणजे दु:ख
पण मला तर वाटते जीवन म्हणजे सुख ॥

जीवन म्हणजे गाणे
जीवन म्हणजे कविता
पण या जीवनाला आहे का कुठे महता ।
जीवन म्हणजे उच्च उच्च पदे
जीवन म्हणजे आशा-आकांक्षा
पण दुसऱ्याची होते यात उपेक्षा ॥

मग यालाच म्हणतात का जीवन !
जीवन ! जीवन ! जीवन !
या तीनच शब्दांनी टाकले आकाश व्यापून ॥

कु. खांबे छाया
बी. ए. भाग - २

## मन

करता प्रतिक्षा तुझी
डोळे माझे विरून गेले
पाहता वाट तुझी

मन हे माझे झुरून गेले ।
पाहता आकाशाकडे
पंछी मनाचे उडून गेले
सरता अवघड वेळ ही
मन हे माझे झुरून गेले ।
दिवसा गाऊन गीत तुझे
स्वर ही आता बिघडून गेले
गाऊन गीत तोंडही थकले
मन हे माझे झुरून गेले ।
असेल कोठे गीत तुझें
आभासात या गाऊन गेले
करता स्मरण तुझे
मन हे माझे झुरून गेले.

हजारे पी. एस.
बी.एस्सी. भाग - १

## ठवण

माझ्या पापण्याच्या प्रदेशात
तु कोठेही हरवत जा
अन कोठेही मिरवत जा
तु अन मी पाहिलेली
स्वप्ने आठवताना
पापण्यावर आलेले पाणी
डोळ्यात साठवत जा.

नामदेव शिंदे
बी.ए. भाग - १

## या मनाची व्यथा

माझ्या मनाला तू आवडत आहेस
पण,तुझ्या मनात काय आहे. ?
तू माझ्याकडे बघतच राहतेस
पण माझ्या मनाची धडधड वहात जाते
नजरेतील प्रेम दिसत आहे
पण तुझ्या मनात काय आहे ?
बोलण्याची हिंमत होत नाही
तुला पाहिल्या शिंवाय दिवस जात नाही
सर्व जगात तु सुंदर आहेस
पण तुझ्या मनात काय आहे ?
प्रत्येक दिवस आनंदात जातोय
तू बघतेस म्हणूनच जगतोय
बघण्याचे सोडलेस तर घात होईल
हृदयातून माझ्या प्राण निघून जाईल.

एस. एम. पाटील
बी.ए. भाग - १

## जीवनात येशील का ?

स्वप्नातील सखे तू
जीवनातच माझ्या येशील का ?
तुझ्या रेशमी केसात
हृदयाचा गुलाब ठेवशील का ?
तुझ्या निळ्या डोळ्यात
माझे रूप साठवशील का ?
नाजूक गुलाबी ओठानी
माझ्याशी तू बोलशील का ?
तुझ्या रेशमी ओठांचा
स्पर्श मला होईल का ?
तुझ्या निळ्या नजरेला
नजर माझी भिडेल का
तुझ्या गुलाबी ओठानां
ओठ माझे भिडतील का ?
जीवनातील सखे तू
सहज जीवनात माझ्या येशील का

ए. एस. शिर्के
बी.ए. भाग - ३

## संदर्भ

शब्द जुळत गेले
पान संपत गेली
पण कळलंच नाही केव्हा
अर्थ लोपत गेला -
तार छेडीत गेले
सूर मिळत गेला
पण कळलंच नाही केव्हा
ताल बिघडत गेला
रेषा ओढत गेलो
रंग भरत गेलो
पण कळलंच नाही केव्हा
भाव ओसरत गेला
जीवनाचे रहस्य उलगडत गेले
सूखदुख:चे क्षण वेचत गेले
पण कळलंच नाही, कळलंच नाही केव्हा
आयुष्य उसवत गेलं

**वैशाली संभुस**
बी.एस्सी. भाग - ३

## स्वप्न

माझ्या मनातील सगळे दिवे
विझवून
अंधाऱ्या डोळ्यानी शोधतो तुझा
प्रकाश
मागील रस्ते दालन करताना
मी
नवीन पायवाट निर्माण केलीस
तू
दुखणाऱ्या उरात उदध्वस्त आठवणींचा
गाव जाळतांना मी
त्या उदध्वस्त गावचं नगर
वसवितांना तू
नको असताना पडलो प्रेमजाळ्यात तुझ्या
मी
तुफान वाऱ्याच्या झांझावान त्याचं
सुन्दर घरटं निर्माण केलस
तू
त्या विखुरलेल्या घरट्यात
तुझं आणि माझं

**कृष्णात सुर्यवंशी**
बी.ए. भाग-

## प्रश्न

उंच उंच आकाशामध्ये
मन माझे भरारी घेते
सांग सख्या मी तुला कोठे रे दिसते ?
सोसायच्याच्या वाऱ्या संगे
मन माझे उडून जाते दूर दूर
सांग सख्या मी तुला कोठे रे दिसते ?
खळखळणाऱ्या पाण्यासंगे
मन माझे धावत जाते सागराकडे
सांग सख्या मी तुला कोठे रे दिसते ?
मन माझे तुझ्या आठवणीने संगे
धावते सदा तुझ्या तुझ्याकडे
सांग सख्या मी तुझ्या ह्रदयात का दिसते ?

**कु. चंद्रभागा प**
बी.ए. भाग

## प्रेम करा

प्रेम करा
रणांगणावर छातीठोकपणे
लढणाऱ्या शुर विरांवर
प्रेम करा
युद्धात तलवार घेऊन
पुरूषपणा गाजविणाऱ्या स्त्रियांवर
प्रेम करा
देशासाठी जीवनांची आहूती
देणाऱ्या थोर नेत्यांवर
प्रेम करा
गळयामध्ये फास अडकून
घोषणा देणाऱ्या क्रांतीकारकांवर
प्रेम करा
नोबेल पुरस्काराला ठोकर देणाऱ्या
महान साहित्यकारांवर
प्रेम करा
नऊ महिने ओझेपेलणाऱ्या
थोर आईवर

शरद बलुगडे
बी.ए. भाग - १

## बंधन

वाटत होते, जुळतील सूर
तुझे नि माझे —
झंकारलेया असत्या तारा
दोघांच्या हृदयाच्या — ।
तू दूर दूर गेलीस
फार उशीर कळल मला,
माझी जड पावल पडू लागली
जलद — तुला गाठायला —
कळेना मला
तू बंधनात होतीस ?
की बंधन आहे.
तुला कुणाचे ?
म्हंटल, आता झाला तेवढा
तमाशा पुरे झाला —
वळू लागलो तर —
माझाही डाव तुझ्याच
बंधनाने साधला

संभाजी चौगले
बी.ए. भाग - २

## चाहूल

युगायुगाच्या प्रवासानंतर
मनाच्या कोपऱ्यामध्ये
तुझी चाहूल जाणवली !
विचारांचे दाट धुके
गजबजलेल्या मनात होते,
तवस्मृतीना उकलत होते.
ह्दयातील कोमलता, केव्हाच लुप्त झाली होती
राहिले होते फक्त पाषाणी ह्दय !
पाषाणी - ह्दय

रमेश मा. पाटील
बी.ए. भाग - १

## व्यथा

ह्दयांतरीचा हुंदका
अनाहूतपणे फुटतो,
तेव्हा, माझे अचल
ओठही थरथरतात,
डोळ्यातील तुझे भाव
रेशमी घाव वाटतात,
तू जेव्हा विद्युलता
होतेस,
तेव्हा, ह्दयांतरीचा
दीप वेदनेच्या
वातीने जळत असतो,
रहस्याने भरलेली
गूढ पाठीवर घेऊन

यात्रीकासारखा !
यात्रीका सारखां !!

नेताजी द. फराकटे
बी.ए. भाग - एक

## अवचित सारे घडून गेले

शब्द तुझे सूर माझे
गीत आज ओठी आहे
आठविता ते सारे जुळले
अवचित सारे घडून गेले

निघून गेलीस माझ्या गावातून दूर
ह्रदयात जपून ठेवीले आठवणींचे खूर
म्हणूनी रांत्रदिन नयन का ओले ?
अवचित सारे घडून गेले.

एकच क्षण मी तुला पाहिले
नकळत गाली हास्य फुटले
प्रेमगीत ओठात तरळले
अवचित सारे घडून गेले

झाली नजनानजर पहिल्या भेटी
बांधुया प्रेमाच्या रेशीम गाठी
दोघाना सारे उमजून गेले
अवचित सारे घडून गेले.

मुळ ओठांच्या पाकळ्यामधूनी
शब्दयुध्द हे हळू उमलले
मी तुजला सर्वस्व अर्पिले
अवचित सारे घडून गेले

शब्दाने शब्द वाढला
दोन घडीचा डाव मोडला
स्नेहबंध ते आज न उरले
अवचित सारे घडून गेले

अशोक मरगू कांबळे
बी.ए. भाग - ३

## एकतर्फी प्रेम

एकतर्फी हत्याकांड प्रकरण
गावोगावी आलय आज
पण या एकतर्फी प्रेमाविरुद्ध
कोण उठविणार आवाज आज ?

या प्रगतींच्या विज्ञान युगात
असुरक्षित आहेत त्या मुली
हत्या करून ही सुरक्षित मुले
खरं कोणतं, खोटं कोणतं ?

हेच सारं कळत नाही
भवितव्य आहे धोक्यात मुलींचं
आणि आपल्या भाळी पिढीचं
पुढे काय घडणार आहे. ?

या एकतर्फी प्रेम प्रकरणांच
प्रत्येक जण वृत्तपत्र वाचतो
खिन्न होऊन विचार करतो
हे सारं घडतं कसं ?

पण हे सार घडत राहत असं
स्वार्थाकडे तरूण वर्ग वळला आहे
देश या साऱ्या प्रकरणाला बळी पडला आहे

पी. एस
बी.ए. भा

## विरह

तू होतीस ...
वाळवंटात जसा एखाद्या प्राण्याला
पाण्याचा सहारा,
पण, आता दूर पर्यंत ...
रखरखता वाळवंट,
सारं जगंच अंधारमय वाटतं,
जगण्याची आशाच उरली नाही,
जीवनाच्या कालचक्रात सकाळ संध्याकाळ
पण, ... माझ्या जीवनात फक्त संध्याकाळ
पहात होतो मी तुझ्याकडे

प्रित कलीच्या वर्तुळातून ...
एकाच वेळी खिडकीतून आकाशाकडे
पहाणाऱ्यांना,
अकाश वेगवेगळे दिसतं,
तसंच आहे ह्या प्रेमाचं...
प्रत्येकाचा दृष्टीकोण वेगळा,
प्रिये प्रेमकरणं पाप नाही
ते शिकवतं दुसऱ्याचं दुःख जाणायलां, स्वार्थत्याग ...
तूमात्र ढकललेस मला स्वार्थाच्या खाईत
विसर मला,
सुखी रहा तू
फुलांचा बहर एका दिवसापुरताच ...
तसेच समज आपल्याही प्रेमाचं.

रमेश मोरे
बी. एस्सी. भाग - २

### आठवण

आठवते का कधी काळी
कोण कुणाचे नव्हतो आपण
ओढ कुणाची नव्हती ठाऊक
मी तुझा अन् माझे माझ्याशी माझे मी पण
तु माझी आठवण, गंध रेशमी मृदु मुलायम
स्पर्श सुखाचा सारेच दर्पन
पुसट चांदण्या चंद्र खोलवर
मधू ओंजळीत माझे प्राशन
हो उच्छवासातील उच्छवास तू
मज डोळ्यातील हेतू प्राण
कोण कुठला, कसले नाते
आठवते का कधी काळी
कोण कुणाचे नव्हतो आपण.

भरत पी. पाटील
बी. ए. भाग - १

### आशा

तुझ्या आठवणीची शिदोरी पाठीशी बांधून
जीवनाच्या वाळवंटातून मार्गक्रमन करतो आहे.
विरहाच्या नयनातून अतूट वाहाणाऱ्या
प्रेममय क्षणांचे अश्रू
आत्म्याचा शांतीसाठी पितो आहे
क्षणोक्षणी डोळ्यासमोर तुझीच प्रतिमा फूलते आहे.
तेथेही रमणाऱ्या मनात माझ्या
विरहाची आग जाळते आहे.
जळतानाही क्षणाक्षणाला तुलाच मी स्मरतो आहे.
तु अखंड साथ देशिल याच आशेवर जगतो आहे.

याच आशेवर जगतो आहे ...

रामचंद्र पाटील
बी. ए. भाग - २

### गरिबी

राब राब राबलो आम्ही
आमच्या हातात नाही पैका
आमचे जीवन म्हणजे
जशा समुद्राच्या लाटा

काय आमची ही दशा
आम्हाला सहन होईना
आम्ही श्रीमंत असतो
जसे आळवावर पाणी असते.

कीव आला या जीवनाचा
पण मरणचं येईना
काय म्हणावे या गरिबीला
शब्दच कळेना.

काय आमच्या हालअपेष्टा
काय आमच्या यातना
म्हणावे काय या गरिबीला
जशा जिवन मरणाच्या लढाया.

देश आमचा महान
गरिबीने झाला लहान
आमचा जीवन संघर्ष
म्हणजे, आमचा मरण संघर्ष

आम्ही पिकवतो भरपूर धान्य
पण आम्हाला मिळत नाही पोटभर अन्न
आमची शक्ती खचत गेली
आम्ही झालो अशक्त

गरिबीने टाहो फोडली
पण आवाज उठेना
आम्ही जन्मलो गरीब
आम्ही गरीबच राहणार का ?

**प्रभावळे एस. जी**
बी.ए. भाग - २

## आई

दे, तुझे सामर्थ्य मला,
महती तुझी गायला ।

दे, तुझी माया मला,
कधी न विसरायला ।

दे, तुझे आशीर्वाद मला,
गीत तुझे रचायला ।

दे, तुझी पूण्याई मला,
पुन्हा प्रफूल्लीत व्हायला ।

दे, तुझे सहनशील हृदय मला,
सावधानतेने पाऊल उचलायला ।

दे, तुझी सावली मला,
सदैव विश्रांती घायला ।

**चंद्रकांत तोरस्कर**
बी.ए. भाग - ३

## अमीर गरीब

गरीब राहतो झोपडीत
आयुष्य सारे कंठत
श्रीमंत राहतो बंगल्यात
जीवन सारे चैनविलासात
कोंड्यांची भाकर हे गरिबाचे अन्न
श्रीमंत खातो मात्र रोज पाचीपक्कवान

गरिबांची भक्ती असेत देवावर
श्रीमंताची श्रद्धा मात्र पैशावर
गरिब असतो सत्याचा भाविक
श्रीमंत असतो पैशाचा लोभिक

गरिबांची वाजते सत्याने घाट
श्रीमंत पहात असतो पैशाची वाट
गरिबांची घेतो सत्यासाठी देवच दाद
पृथ्वीतलावर होईल पुन्हा काळ्यागोऱ्याचा वाद

**चिंदगे पांडूरंग गणपती**
बी.ए. भाग - १

## अजूनही विश्वास बसत नाही

अजुनही वाटत नाही खरं
झाल कसं हे सार
हे सत्य होते की स्वप्न
हाच पडतो मला प्रश्न
गुंफले होते नाजुक हातात हात
एकमेंकांचे,
वाटत होते कधीच सुटू नयेत
क्षण एकांताचे
दिलास तू तुझ्याजवळील अनमोल ठेवा
माझं मन सुद्धा करीत असेल हेवा
दिलेस तु सुख मला क्षणभर
पण विसरु शकणार नाही मी जीवनभर

**सावजी पाटील**
बी.ए. भाग - २

## प्रिती

बहारून गेले मन तरी सर्व काही लिहले
माझ्या प्रिय सखेला हे प्रेमपत्र लिहले,

कोठे चुकार पक्षी जागा नसावा
झाडा अडून चंद्र हळूहळू मंद व्हावा

